CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३३४ वा ▶ शनिवार दि. ३० सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

महिला आरक्षण विधेयकाचे कायद्यात रुपांतर

नवी दिल्ली । नारी शक्ती वंदन अधिनियमला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. याबाबत अधिसूचनाही जारी करण्यात आली

आहे. म्हणजे आता ३३ टक्के महिला आरक्षणाचा कायदा झाला आहे. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशाला दिलेले आणखी आश्वासन पूर्ण केले आहे. संसदेत हे विधेयक 'नारी शक्ती वंदन विधेयक' म्हणून सादर करण्यात आले होते.

न्यूज कॉलम

चालत्या बसचे टायर निघून कारला धडकले

नाशिक । चालत्या बसचे मागील टायर निघून पुढे एक किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या कडेला उभ्या कारवर जाऊन आदळल्याची घटना पाचोरे वणी फाट्यावर घडली. धुळे आगाराच्या धुळे - नाशिक बायपास विनावाहक बसचे (क्र. एमएच - २० - जीसी - ३५६०) पाठीमागील टायर निखळून पुढे एक किलोमीटर जाऊन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला (क्रमांक एमएच ०६ एएस-७७९४) जोरदार धडकले. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

धुळ्यात आज पैगंबर जयंतीनिमित्त मिरवणूक

धुळे । पैगंबर हजरत मुहम्मद यांचा जन्मदिवस अर्थात ईद-ए-मिलाद निमित्त आज सकाळी ९ वाजता मुस्लिम बांधवातर्फे शहरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. मच्छिबाजार येथून काढण्यात येणार्या या मिरवणुकीत मुस्लिम बांधव हजारोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत. आज सकाळी ९ वाजता शहरातील मच्छिबाजार येथून मिरवणुकीला सुरवात होईल. येथून ही मिरवणूक आग्रारोडमार्ग दाता सरकार येथे येईल. त्यानंतर पुन्हा मच्छीबाजार येथे मिरवणूक आल्यानंतर समारोप होईल. पोलीस प्रशासनाने बंदोबस्ताचे नियोजन केले आहे.

पवार - भुजबळ यांच्यात खडाजंगी!

ओबीसींच्या आकडेवारीवरून बैठकीतच 'राष्ट्रवादी'चे नेते भिडले

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर आली आहे. राज्यात सध्या मराठा, ओबीसी आणि धनगर आरक्षणाचा मुद्दा पेटला आहे. मराठा कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावं, अशी मागणी केलीय. पण राज्य सरकारने तसं करु नये, यासाठी ओबीसी समाजाकडून राज्यभर आंदोलन सुरु आहे. याच मुद्द्यांवरुन ओबीसी नेत्यांच्या शिष्टमंडळाची आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेक महत्त्वाचे मंत्री आणि नेते या बैठकीला हजर होते. यावेळी अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्यात ओबीसींच्या मुद्द्यांवरुन जोरदार खडाजंगी झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यात ओबीसींच्या मुद्यावरून जोरदार खडाजंगी झाल्याची माहिती समोर आली आहे. ओबीसींच्या आकडेवारीवरून दोघांमध्ये बैठकीतच खडाजंगी झाली. छगन भुजबळ यांनी मांडलेली अशी कोणतीही आकडेवारी खरी नाही. तशी आकडेवारी असेल तर दाखवून द्यावी, असं थेट आव्हान अजित पवारांनी भुजबळांना दिलं. ओबीसी आरक्षणासंदर्भात ओबीसी महासंघ आणि इतर ओबीसी नेत्यांची सरकारसोबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. छगन भुजबळ यांनी बैठकीत मंत्रालयात काम करणाऱ्या ओबीसी समाजाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आकडेवारी मांडली. ओबीसींवर अन्याय होतोय. ओबीसी समाजाचे कमी अधिकारी मंत्रालयात आहेत, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.छगन भुजबळ यांनी दिलेल्या माहितीवर अजित पवार यांनी आक्षेप घेतला. ही माहिती साफ चुकीची आहे. ही माहिती खरी असेल तर भुजबळांनी याबाबतचे पुरावे दाखवावे, असं अजित पवार बैठकीत म्हणाले. यानंतर पुन्हा दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे बैठकीत काही क्षणासाठी तणावाचं वातावरण निर्माण झालेलं बघायला मिळालं, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या बैठकीत सरकारने ओबीसी नेत्यांना महत्त्वाचा शब्द दिला. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिलं जाणार नाही, असं सरकारने ओबीसी नेत्यांना सांगितलं. ज्यांच्या जुन्या कागदपत्रांमध्ये कुणबी असा उल्लेख असेल त्यांनाच संबंधित प्रमाणपत्र दिलं जाईल, असं सरकारने सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. ओबीसी आकडेवारीच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात आज जोरदार खडाजंगी झाली. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आज सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित बैठकीतच दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार वाद झाल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे. भुजबळांनी मांडलेल्या आकडेवारीवर अजित पवारांनी आक्षेप घेतला.

ओबीसींची जास्त संख्या, अजित दादांचा दावा

छगन भुजबळ यांनी मंत्रालयीन कर्मचाऱ्यांसंबंधी सादर केलेल्या आकडेवारीवर अजित पवारांनी आक्षेप घेतला. मंत्रालयात ओबीसी कर्मचारी ८ टक्के असल्याची आकडेवारी खरी नसून, जास्त कर्मचारी आहेत, असा दावा त्यांनी केला. ही माहिती साफ चुकीची आहे. ही माहिती खरी असेल तर भुजबळांनी याबाबतचे पुरावे दाखवावे, असं अजित पवार बैठकीत म्हणाले. यानंतर पुन्हा दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे बैठकीत काही क्षणासाठी तणावाचं वातावरण निर्माण झालेलं बघायला मिळालं होत. दरम्यान ओबीसीच्या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन मोठे नेते आपापसात भिडल्याने चर्चा सद्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन

ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात सह्याद्रीवर सर्वपक्षीय आणि काही संघटनांसह बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ओबीसी नेते म्हणून छगन भुजबळ हजर होते. यावेळी इतर मुद्द्यांवर चर्चा सुरू असताना छगन भुजबळ यांनी मंत्रालयातील ओबीसी कर्मचाऱ्यांचा मुद्दा मांडला. छगन भुजबळ यांनी मंत्रालयात ओबीसी कर्मचाऱ्यांसाठी फक्त ८ टक्के आरक्षण असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी आकडेवारीही संपूर्ण माहिती सादर केली.

मराठ्यांना सरसकट ओबीसी दाखला नाही

दरम्यान, या बैठकीत सरकारने ओबीसी नेत्यांना महत्त्वाचा शब्द दिला. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिलं जाणार नाही, असं सरकारने ओबीसी नेत्यांना सांगितलं. ज्यांच्या जुन्या कागदपत्रांमध्ये कुणबी असा उल्लेख असेल त्यांनाच संबंधित प्रमाणपत्र दिलं जाईल, असं सरकारने सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. राज्य शासनाच्या वतीने सह्याद्री अतिथीगृहावर ओबीसी आरक्षणावर बैठक घेण्यात आलेली आहे. या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार उपस्थित होते. परंतु विरोधी पक्षातील कोणत्याही नेत्याला या बैठकीस आमंत्रण दिले गेलेले नाही. यावरून अंबादास दानवे यांनी राज्य सरकारचा निषेध व्यक्त करत स्वपक्षातीलच ओबीसी नेत्यांना सत्ताधाऱ्यांनी बोलविल्याचे असल्याचे म्हटले आहेत.

ठाकरे गटाकडून विधानसभा अध्यक्षांविरोधात सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल

मुंबई । प्रतिनिधी

सध्या शिवसेनेचा आमदार अपात्रतेचा विषय ज्वलंत आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे यावर निर्णय घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आमदार अपात्रतेच्या निर्णयावर सर्व सूत्र नार्वेकरांकडे सोपवल्यावर सुप्रीम कोर्टाकडून योग्य वेळेत निर्णय घ्यावा अशी सूचना त्यांना करण्यात आली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने त्यांच्याकडे आमदार अपात्रतेच्या प्रकरणाची सुनावणी कशी घेतली जाईल याचा रोडमॅप मागितला होता.

विधानसभा अध्यक्षांनी हा रोडमॅप सादर केल्यावर ठाकरे गटाने यावर आक्षेप घेतला होता आहे. याबाबत ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांविरोधात सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे. ठाकरे गटाचे वकील सनी जैन यांनी ठाकरे गटाकडून हे प्रतिज्ञापत्र दाखल केलं. विधानसभा अध्यक्षांनी जे वेळापत्रक जाहीर केलं,त्यात होणार विलंब पाहता ठाकरे गटानं सुप्रीम कोर्टात आक्षेप नोंदवला.अपात्रतेचा मुद्दा सोडून अध्यक्ष वेळ घालवत आहेत, असा आक्षेप ठाकरे गटाकडून नोंदवण्यात आला.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना वेळापत्रक सादर करण्यासाठी दोन आठवड्यांना वेळ देण्यात आला होता. त्यावर ३ ऑक्टोबरला सुनावणी करण्यात येणार होती, पण ही सुनावणी ६ ऑक्टोबर या दिवशी ढकलण्यात आली. विलंबाचा हा विषय ६ तारखेला होणाऱ्या सुनावणीत मांडू असं वक्तव्य ठाकरे गटाने नेते अनिल परब यांनी केलं. शिवसेनेच्या १६ आमदारांनी भाजपसोबत सत्ता स्थापन केल्यावर शिवसेना पक्षात दोन गट निर्माण झाले होते. शिवसेनेच्या ठाकरे गटाने या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यात यावं यासाठी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. अपात्रता मुद्दा सोडून इतर विषयात अध्यक्ष वेळ घालवत आहेत, असा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

दोंडाईचाला भरणार टेनिस बॉल क्रिकेटचा महाकुंभ

देशभरातून ३२ राज्यांचे संघ हस्ती चॅम्पियनशिपसाठी संघ झुंजणार!

फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी केली व्यवस्थेची पाहणी

दोंडाईचा । प्रतिनिधी

भारतीय टेनिस बॉल क्रिकेट फेडरेशनच्या मान्यतेने व महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट संघटनेच्या अधिपत्याखाली धुळे जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटना येत्या नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यामध्ये दोंडाईचा येथे प्रथमच राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करणार आहे. स्पर्धेत देशभरातील मुलांचे ३२ संघ व मुलींचे २० संघ सहभाग घेणार आहेत. धुळे जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष हस्ती पब्लिक स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या आयोजन व्यवस्था पाहण्या करिता नुकतेच भारतीय टेनिस बॉल क्रिकेट फेडरेशनचे चेअरमन व राज्य संघटनेचे सचिव डॉ. मोहम्मद बाबर व उत्तर महाराष्ट्राचे टेनिस बॉल क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष वासेफ पटेल यांनी स्पर्धा संदर्भातल्या आयोजन कमिटी सोबत विविध विषयांवर चर्चा केली.

दोडांईचा येथे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या निरीक्षणासाठी फेडरेशनच्या सदस्यांनी भेट दिली. स्पर्धेत ३५० पेक्षा जास्त मुलांच्या गटात खेळाडू व २५० मुलींच्या गटात खेळाडू स्पर्धेत भाग घेणार असून त्यांच्यासोबत त्या- त्या राज्य संघटनेचे पदाधिकारी ही दाखल होणार आहे. याकरिता हस्ती पब्लिक स्कूलच्या मैदानाची पाहणी, खेळाडूंची राहण्याची व्यवस्था, वाहतुकीसाठी व्यवस्था, वेलकम स्वागतासाठीचे नियोजन, भोजनाची व्यवस्था यासह इतर बाबींवर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी धुळे जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटनेचे सचिव विशाल पवार यांच्यासह त्यांचे सहकारी उपस्थित होते. सोमवारी दिवसभर याबाबत टीमने पाहणी केली.

राज्य क्रिकेट संघटने तर्फे कैलास जैन यांचा सत्कार

दोंडाईचाला तालुक्याचा दर्जा सुद्धा प्राप्त नसून अशा ठिकाणी इतक्या मोठ्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी हस्ती पब्लिक स्कूलचे सर्वेसर्वा कैलास जैन यांनी स्विकारली असून; याकरिता राज्य टेनिस बॉल क्रिकेट संघटनेचे सचिव डॉ. मोहम्मद बाबर यांनी कैलास जैन यांचा स्नेहभेट प्रदान करून सन्मान केला.

विसर्जन मिरवणुकीवेळी नाशिकरोडला तिघांचा मृत्यू

नाशिक । प्रतिनिधी

विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी नाशिकरोड परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी तीन जण बुडून पावल्याची दुःखद घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. गुरुवारी सायंकाळी पाच वाजेला वडनेर येथील वालदेवी नदी पात्रात बुडालेल्या हेमंत कैलास सातपुते या इसमाचा मृतदेह आज सकाळी नऊ वाजता सापडला. तब्बल १६ तासानंतर मृतदेह शोधण्यास अग्निशामक दल व स्थानिक नागरिकांना यश आले.

हेमंत कैलास सातपुते हा गुरुवारी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान वडनेर दुमाला येथील वालदेवी नदीपात्रामध्ये गणपती विसर्जन दरम्यान पाण्यात बुडाला होता. त्यानंतर त्याला वाचण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु पाणी जास्त असल्याने त्याचा शोध लागला नाही त्यातच अंधार झाल्यामुळे शोधकार्य थांबविण्यात आले होते. परिणामी आज सकाळी नऊ वाजता स्थानिक नागरी तसेच माजी नगरसेवक केशव पोरजे जगदीश पवार अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी शोध घेतला असता सदरचा मृतदेह आढळून आला. या घटनेमुळे वडनेर दुमाला परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. तर दुसऱ्या एका घटनेत चेहडी येथील संगमेश्वर नदीपात्रात सिन्नर फाटा परिसरात राहणारे प्रसाद सुनील दराडे १८ व त्याचा मित्र रोहित वैद्यनाथ नागरगोजे वय २२ हे दोघे जण चेहडी संगमेश्वर येथील नदीपात्रात श्री गणपती मूर्ती विसर्जन करण्यासाठी गेले असता प्रसाद दराडे याला पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे पाय घसरून तो पाण्यात पडला व डुबू लागला त्याला वाचविण्यासाठी रोहित नागरगोजे यांनी पाण्यात उडी मारली. परंतु पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने दोघेही जण पाण्यात बुडाले व वाहून गेले. त्यानंतर या ठिकाणी असलेल्या पोलिसांनी व स्थानिक नागरिकांनी दोघांना बाहेर काढले व तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासून मयत घोषित केले.

धुळ्यात बाप्पाची मूर्ती घेऊन जाणाऱ्या टेम्पोने ४ जणांना उडवले

धुळे । प्रतिनिधी

संपूर्ण राज्यभरात गुरुवारी गणेश विसर्जनाची धामधूम पाहायला मिळाली. आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी भाविकांनी ठिकठिकाणी प्रचंड गर्दी केली. धुळे शहरातील गणपती विसर्जन मिरवणूक बघण्यासाठी जात असलेल्या चार भाविकांना भरधाव टेम्पोने जोरदार धडक दिली. या धडकेत एका चिमुकलीसह तिघे गंभीर जखमी झाली आहे. सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवितहानी झाली नाही. तीन वर्षीय चिमुकलीच्या पायावरून टेंपो गेल्यानी तिला गंभीर दुखापत झाली आहे. मात्र, एका १४ वर्षीय मुलाच्या पोटावरुन टेम्पो गेल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या घटनेने संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली आहे.

शिवाजी रोडवर एका वाहनाचे ब्रेक फेल झाल्याने अपघात झाला. या भरधाव वाहनाने चार गणेशभक्तांना चिरडल्याने चौघे जखमी झाले. यात तीन बालकांसह एका महिलेचा समावेश असून यातील दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. अबालवृध्दांसह तरुण मंडळी पांझरा नदीकिनारी गणेश विसर्जनासाठी मार्गस्थ होत होते. विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी गणेशभक्तांनी शहरातील मुख्य रस्त्यांवर गर्दी केली होती. रात्री ८.३० वाजेच्या सुमारास गणेशमूर्ती विजर्सनासाठी जाणार्या एका टेम्पोचे ब्रेक फेल झाल्याने हे वाहन भाविकांना चिरडत थेट शिवाजीरोडवरील श्री स्वामी समर्थ गणेश मंडळाच्या आरासमध्ये शिरले. या अपघातात तीन वर्षीय सायली जोहरी तसेच तिची आई जस्सी जोहरी आणि पिंकी जोहरी हे तिघेही जखमी झाले. या तिघांवर एका खाजगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. यात सायली जोहरी या तीन वर्षीय चिमुकलीचा पाय फ्रॅक्चर झाला असून, तिची आई गंभीर जखमी झाली आहे. तसेच एका १४ वर्षीय मुलाच्या पोटावरून टेम्पो गेल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शीनी दिली. अपघातानंतर टेम्पो चालकाने घटनास्थळाहून पळ काढला. त्यामुळे नेमका हा अपघात कसा झाला हे समजू शकलेले नाही.

बुधवारी नाशकात राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे आयोजन

गीतसूर्य केशवराव भोसले स्मृति समारोहनिमित्त

धुळे । पुरुषोत्तम पाटील

महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरेला अभिनय आणि गायनाच्या माध्यमातून भारतीय संगीत रंगभूमीला सुवर्णयुगात नेणारे संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या १०२ व्या स्मृती समारोह निमित्त संगीतसूर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेच्या वतीने नाशिक येथे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन बुधवार दि. ४ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता करण्यात आले असल्याची माहिती परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा आयोजक दिलीप साळुंखे यांनी पत्रकान्वय प्रसिद्धीस दिली आहे.

गंगापूर रोडवरील राजुर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेजच्या सभागृहात या परिषद मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली होत असून दुपारी २ वाजता उद्घाटन मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी संगीतसूर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सतीश पावडे, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, विभागीय अध्यक्ष दिपक भदाणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र निंबाळते, जिजाऊ ब्रिगेडच्या माधुरी भदाणे, उद्योजक कक्षाचे विशाल देसले. आदि उपस्थित राहणार आहेत. तीन सत्रात विभागलेल्या

या परिषदेत प्रसिद्ध नाटककार दत्ता पाटील, प्रसिद्ध सिने नाट्य दिग्दर्शक सचिन शिंदे आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक भोजराज चौधरी यांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय वाटचाली संदर्भात मुक्त चर्चेचे आयोजन करण्यात आले असून यावेळी संगीत नाटकातील गितांचे सादरीकरण होणार आहे.

समारोप सत्रात नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील आणि सार्वजनिक बांधकाम नाशिक विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी, प्राचार्य प्रशांत पाटील,उद्योजक साहेबराव साळुंकेपाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय अशी कामगिरी करणाऱ्या आणि संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे वंशज असलेल्या परिवारातील सदस्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. मराठा समाजाच्या सांस्कृतिक चळवळीचा आणि विशेष वैभवाचा भाग म्हणून आयोजित कार्यक्रमासाठी कलाक्षेत्रासह विविध सामाजिक, सांस्कृतिक चळवळीतील मान्यवरांसह रसिक श्रोत्यांसह मराठा सेवा संघाच्या सर्व कक्षाच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने मनोज आमले, ड. माधव मुधाळे, उल्हास बोरसे, संदीप सोमवंशी, उमेश शिंदे, सुनील घुले, अमित पवार, सागर पाटील, मंगेश टर्ले, अरविंद देशमुख, बाळासाहेब आमरे, महेंद्र बच्छाव, डॉ. संदीप बोरसे, शिल्पा देशमुख, कल्पना रेवगडे, अश्विनी भाकरे, विनायक चव्हाण, अमोल पाटील, चेतन देवरे, आदित्य कडलग, सुनिल कोईंकर, विक्रम कदम, क्रांती बेडसे, कुणाल देसले आदिंनी केले आहे.

धनगर समाजाला आदिवासीमधून आरक्षण देऊ नये; रास्तारोको आंदोलन

नाशिक । प्रतिनिधी

धनगर समाजाला आदिवासी आरक्षणातून आरक्षण द्यावे, अशी मागणी धनगर समाजाकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर धनगर समाजाचे सलग २१ दिवस आंदोलन सुरु होते. मात्र या मागणीवरून आता नाशिक जिल्ह्यात आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. धनगर समाजाला आदिवासींमधून आरक्षण देऊ नये या मागणीसाठी दिंडोरीसह त्र्यंबकेश्वर तालुक्यात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्याचबरोबर येत्या १ ऑक्टोबर रोजी देखील आंदोलन करण्यात येणार आहे. 'धनगर समाजाला आदिवासीमधून आरक्षण देऊ नये' अशी मागणी आदिवासी समाजाकडून करण्यात येत आहे.

दिंडोरी शहरात मोठ्या संख्येने तालुका परिसरातील आदिवासी बांधवानी एकत्रित येत रास्ता रोको आंदोलन केले. नाशिक-वणी रस्त्यावर आदिवासी समाजाचं रास्ता रोको आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. सरकारकडे आदिवासी समाजाच्या मागणीकडे गांभीर्याने घ्यावे असे आवाहन करण्यात आले. त्याचबरोबर आधीच आमच्या समाजात आरक्षण कमी असून इतरांना समाविष्ट करू नये, अशी मागणी यावेळी आंदोलकर्त्यांकडून करण्यात आली.

शिक्षण हक्काची पायमल्ली

कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करून त्यांचा नजीकच्या शाळांत समावेश करण्याची योजना 'समूह शाळां'च्या रूपाने पुन्हा समोर येणे ही बाब धक्कादायक नाही; कारण गेल्या अनेक वर्षांपासून ती चर्चेत आहे. मात्र, ही योजना निश्चितच चिंताजनक आहे. शैक्षणिक साधनांचा कमाल उपयोग करून घेण्याचे व्यावहारिक कारण दाखवून ही योजना साकारण्यात आली असली, तरी त्यामुळे विद्यार्थ्यांना कायद्याने मिळालेल्या शिक्षण हक्काचा भंग होणार आहे.

सहा ते चौदा वयोगटातील मुला-मुलींना त्यांच्या घराच्या जवळ शाळा देण्याचा कायदा असताना, या योजनेमुळे मात्र विद्यार्थ्यांना लांबच्या शाळांना जावे लागेल; कारण घराजवळ असलेल्या कमी पटसंख्येच्या शाळा बंद होतील. राज्यात अशा शाळांची संख्या पंधरा हजारांच्या घरात जाणार असून, त्याचा फटका पावणे दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना बसेल. कमी पटसंख्या असलेल्या शाळांना सुविधा पुरविता येत नाहीत, तेथील विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत नाही आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होत नाही, असा युक्तिवाद यासाठी केला जात असला, तरी तो तोकडा आहे. सरकारची इच्छाशक्ती असेल, तर कमी पटसंख्येच्या, अगदी एक विद्यार्थी असलेल्या शाळेतही सुविधा निर्माण करता येतात. कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळा प्रामुख्याने ग्रामीण आणि दुर्गम भागांत आहेत. तिथे अन्य सुविधांची तुलनेने वानवा आहे. तरीही परिस्थितीशी झगडत तेथील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या या शाळा बंद केल्यास विद्यार्थ्यांना दूरवरच्या शाळांत जावे लागेल. अशा परिस्थितीत अनेक मुलांचे, विशेषत: मुलींचे शालेय शिक्षण थांबण्याचा धोका आहे. एकीकडे शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाची भाषा करायची आणि दुसरीकडे काहींचे शिक्षण थांबू शकेल, अशी परिस्थिती निर्माण करायची, हा दुटप्पीपणा आहे; तो तातडीने थांबवायला हवा.

एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस होऊन साडेपाच दशके झाली आहेत. प्रत्यक्षात जेमतेम तीन ते साडेतीन टक्के रक्कम शिक्षणासाठी खर्च केले जातात; परंतु ही रक्कमही जास्त असल्याचा भास सरकारमधील मंडळींना होतो आहे. त्यामुळेच, शाळा दत्तक घेण्याचे आवाहन कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना केले जात आहे. कंपन्यांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीद्वारे (सीएसआर) शाळांना मदत करावी आणि त्याच्या बदल्यात शाळांना या कंपन्यांचे नाव दिले जावे, असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने त्यासाठी घेतला आहे. शाळांवर खर्च करण्यासाठी सरकारकडे निधी नाही किंवा सरकारची तशी इच्छा नाही, असा अर्थ यातून कोणी काढला, तर कसा चुकीचा ठरेल? समूह शाळा प्रत्यक्षात आल्यास त्याचा फटका प्रामुख्याने जसा ग्रामीण आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना बसेल, तसाच प्रकार शाळा दत्तक योजनेमुळे होऊ शकतो. राज्यात बहुतेक कॉर्पोरेट कंपन्या प्रामुख्याने मुंबई-पुणे पट्ट्यात आहेत. तेथील कंपन्याही याच भौगोलिक परिसरात 'सीएसआर'चा निधी खर्च करतात. त्यामुळे पुणे, ठाणे, नाशिक आदी जिल्ह्यांतील शाळा दत्तक घेण्यासाठी कंपन्या कदाचित पुढे सरसावतील; परंतु मराठवाडा आणि विदर्भ यांमधील, तसेच राज्याच्या अन्य दुर्गम भागांतील शाळा दत्तक घेण्यासाठी कोण पुढे येणार, असा प्रश्न आहे. मुळात हा सारा खटाटोप करण्याची काहीच आवश्यकता नाही. मुलांना शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी असून, त्याने ती नाकारू नये. 'कल्याणकारी राज्या'ची भाषा करणाऱ्यांनी त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा देण्यापासून दूर जाऊ नये.

वास्तविक शिक्षणावरील खर्च ही प्रत्यक्षात देशाची भावी पिढी घडविण्यासाठीची गुंतवणूक असते. त्याकडे खर्च किंवा ओझे म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन दूर व्हायला हवा. मात्र, गेल्या तीन दशकांपासून हा दृष्टिकोन देशात जाणीवपूर्वक विकसित केला जात आहे. केवळ व्यावसायिक शिक्षणाचेच नव्हे, तर शालेय शिक्षणाचेही बेसुमार खासगीकरण याच काळात झाले आहे. खासगी शिक्षण म्हणजे उत्तम शिक्षण असा गैरसमज निर्माण करून देण्यात येथील संपूर्ण यंत्रणा यशस्वी ठरली आहे. परिणामी शिक्षणाकडे एक बाजारपेठ म्हणून पाहिले जात असून, त्यामधील नफ्यावर डोळा ठेऊन धनदांडगे या क्षेत्रात उतरत आहेत. त्यांना पूरक आणि पोषक ठरेल, असेच वातावरण या साऱ्या काळात निर्माण केले गेले. खासगी शाळांमधील महाग शिक्षण न परवडणारा मोठा वर्ग समाजात असून, तो प्रामुख्याने सरकारी शाळांत येतो. या घटकातील मुला-मुलींना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी सरकारने तिथे सुविधा देण्याची आवश्यकता आहे. प्रत्यक्षात मात्र या सुविधा देण्यातील अडचणींकडे बोट दाखवून शाळा बंद करण्याचा प्रयत्न होतो आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या मुळावर येणारे हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी समाजातील सूज्ञ घटकांनी सरकारवर दबाव आणायला हवा.

विसर्जनानंतर उरले काय?

पार्थिव गणेशमूर्तीचे विसर्जन झाल्यानंतर जाणवणारी हुरहुर, वाटणारा एकटेपणा, उत्सवाचा समारोप झाल्यानंतर दिनचर्येला लागताना जाणवणारी मरगळ हे सर्व सध्या प्रत्येकजण अनुभवत असेल. मात्र दर वर्षीचा गणेशोत्सव आपल्याला खूप काही शिकवून जात असतो. बदलत्या काळानुसार उत्सवाच्या स्वरूपात बदल घडवून आणण्याची गरज दाखवून देत असतो. प्रत्येक गणेशभक्ताने काळाच्या या गरजेचाही विचार करायला हवा.

एखादे मंगलकार्य संपन्न पार पडल्यानंतर अनुभवास येणारे एकाकीपण, हुरहुर, कंटाळवाणी अवस्था हे सर्व काही बघायला मिळण्याचा काळ म्हणजे अनंत चतुर्दशीनंतरचे दिवस. पार्थिव गणेशमूर्तीच्या विसर्जनाबरोबरच कदाचित काही काळासाठी घरातील चैतन्यही हरवल्यासारखे वाटते. दहाव्या दिवशी गणपतीला निरोप द्यावा लागणार आहे, हे ठाऊक असूनही दरवर्षी मनात त्याच्या वियोगाच्या भावनांची दाटी होतेच. आताचे दिवसही तसेच आहेत. मात्र हेही बरेच काही सांगून, शिकवून जाणारे आहे.

काही देवांच्या मूर्ती वा प्रतिमा घरात नेहमीच असतात. मात्र पार्थिव गणेश वर्षातून एकदा येतो आणि विसर्जनाच्या दिवशी आपला निरोप घेतो. गणेशाची मूर्ती निवडताना, खरेदी करता काही वेळा विक्रेत्याशी किमतीबद्दल घासाघीस होते. एका अर्थी तेव्हा ती पैसे देऊन खरेदी केलेली वस्तू असते. पण हीच मूर्ती घरात येते, तिची प्राणप्रतिष्ठा होते आणि नंतर विसर्जनाच्या दिवशी जायला निघते तेव्हा प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी तरळत असते. तेव्हा मात्र ती वस्तू नसून देवत्व लाभलेली एक प्रतिमा असते. उत्सवाच्या काळात गणेशाच्या या रूपाशी आपले भावनिक नाते जोडले गेलेले असते. अशी समरसता, एकरूपता आणि कृतज्ञता हे आपल्या भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. आपण काही वनस्पतींची, बैलपोळ्याला बैलाची, वसुबारसेच्या दिवशी गायीची, नागपंचमीला नागाची पूजा करतो. या सर्व माध्यमातून आपण परमेश्वराबद्दलची कृतज्ञताच व्यक्त करत असतो. ही भावना आणि निरलस प्रेम असल्यामुळेच पार्थिव गणेशाच्या विसर्जनाची घटिका भाविकांना विव्हल करून जाते. त्याचा विरह दु:खी करून जातो.

खरे सांगायचे तर संपूर्ण गणेशोत्सवातूनच आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते. गीतेमध्ये सांगितल्यानुसार माणूस जन्माला येणे आणि त्याचा मृत्यू होणे हे वस्त्रासमान असते. वस्त्र जीर्ण झाल्यानंतर बाजूला करून नवीन वस्त्र परिधान केले जाते, त्याचप्रमाणे आत्मा देह धारण करत असून

देह जीर्ण झाल्यानंतर तो त्यागून नवीन देह धारण करतो. आपली संस्कृती जन्म आणि मृत्यूकडे अशा नजरेने बघत असताना गणेशोत्सवातही त्याचेच प्रतिबिंब बघायला मिळते. इथे गणेशाची मातीची मूर्ती प्रतिष्ठापित होते, देवाचा तो अवतार दहा दिवस चराचरात आनंद निर्माण करतो, उत्साह आणि जल्लोश पसरवतो आणि दहा दिवसांनंतर ती मूर्ती मातीत मिसळून नष्टही होऊन जाते. यातून माणसाला मिळणारा संदेश असा की, या मूर्तीप्रमाणे आपणही पृथ्वीवर काही काळासाठीच आलो आहोत. एक दिवस आपल्या शरीराचीही माती होणार आहे. पंचतत्त्वापासून बनलेले आपले शरीर त्याच तत्त्वांमध्ये मिसळून जाणार आहे. त्यामुळेच गणपती दहा दिवस आनंद निर्माण करतो. त्याचप्रमाणे तू देखील इथे येऊन आनंद निर्माण करायला हवा. गणेशोत्सवाद्वारे आपल्यापर्यंत पोहोचणारा हा विचार लक्षात घेतला आणि त्यानुसार वर्तन ठेवले तर प्रत्येकाचे जगणे आनंददायी, सहज आणि चैतन्यमय होऊ शकेल.

यंदा गणेशोत्सव अत्यंत धुमधडाक्यात संपन्न झाला. मधल्या काही काळात या उत्सवाला विकृत स्वरूप प्राप्त झाले होते. अश्लील गाणी, त्यावरील नृत्य, कमालीचा गोंगाट, गदारोळ अशा हिणकस स्वरूपामुळे या उत्सवाला गालबोट लागल्याचे अनुभवायला मिळत होते. पण आता हा प्रकार बऱ्यापैकी कमी झाल्याचे बघायला मिळणे ही निश्चितच सकारात्मक बाब म्हणावी लागेल. थोडे मागे वळून पाहायचे तर ज्ञानप्रबोधिनीचे आप्पासाहेब पेंडसे, गरवारे शाळेचे गाडगीळ सर, रँगलर महाजनी, दगडूशेठ गणेशोत्सव मंडळाचे तात्यासाहेब गोडसे, मंडईचे थोरात अशा त्या काळातील जाणत्या मंडळींनी या खटकणाऱ्या गोष्टींबद्दल आवाज उठवला होता. प्रवाहाच्या काठावर बसून त्यात काय चूक आहे हे सांगणे सोपे असते, मात्र सगळ्यांनी प्रवाहात उतरून घाण दूर करण्याचे आणि संबंधित जागा स्वच्छ करण्याचे खूप मोठे काम करून ठेवले. आप्पासाहेब पेंडसे यांचे वैशिष्ट्य असे की काही लोक गणेशोत्सवामध्ये चित्रपटातील गाण्यांवर अश्लील नृत्य करत असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी प्रबोधिनीच्या मुलांना ढोलाच्या, हलगीच्या तालावर लेझीम वा बरची नृत्य शिकवण्यास सुरुवात केली आणि बघता बघता मिरवणूक देखणी, प्रदर्शनीय झाली. यंदाही अशीच देखणी विसर्जन मिरवणूक आपण अनुभवली. केवळ पुण्याचाच विचार केला तर इथे ढोल पथकांमध्ये पन्नास हजारांपेक्षा अधिक मुले-मुली काम करताना दिसतात, हे दखलपात्रच.

गणेशोत्सवाने दिलेले विधायक वळण हादेखील नोंद घेण्याजोगा मुद्दा म्हणायला हवा. काही वर्षांपूर्वी मला दगडूशेठ हलवाई मंडळातर्फे आयोजित गणेशोत्सव स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. तेव्हा उत्सवाचे हे विधायक वळण मला जवळून अनुभवता आले. परीक्षकाचे काम करताना मी जवळपास ४००-५०० मंडळांना भेटी दिल्या. माझ्यासाठी ते एक विराट दर्शनच होते. टिळकांनी काय पेरले होते आणि काय उगवले, हे तेव्हा मला अगदी जवळून बघायला मिळाले. आम्ही मंडळांना भेट द्यायचो तेव्हा काही प्रश्न विचारायचो. त्यात तुम्ही आता मांडवात काय केले हे सांगू नका, तर वर्षभर काय करता हे सांगा, असा प्रश्न असायचा. त्याची उत्तरे ऐकून आम्ही चकित व्हायचो. तेव्हा समजले की, गणेशोत्सव साजरा करताना मुले केवळ दहा दिवस एकत्र येऊन काम करत नाहीत, तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या सामाजिक उपक्रमांमध्येही भाग घेतात. काही गणेश मंडळातील कार्यकर्ते वर्षभरात रक्तदान शिबिरे घेतात, अनाथ विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित करतात, वृद्धाश्रमांना भेटी देतात. एखाद्या ठिकाणी वादळ, पूर, भूकंप यांसारखी नैसर्गिक आपत्ती आली तर एकत्र येऊन, ताबडतोब पोहोचून गरजूंना कोणत्या गोष्टींची गरज आहे ते बघतात आणि त्या पुरवण्याची व्यवस्था करतात. थोडक्यात, त्यांच्या माध्यमातून तिथे मदतीचा ओघ सुरू होतो. एका मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, आम्ही दर वर्षी एक जानेवारी या दिवशी झाड लावतो आणि आधी लावलेल्या सगळ्या झाडांचा वाढदिवसही साजरा करतो. यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये लावलेली झाडे जिवंत आहेत की नाहीत, त्यांची स्थिती काय आहे हे आम्हाला बघता येते. म्हणजेच या कामातून गणेश मंडळांकडून पार पडणाऱ्या अनेक उत्तम कामांची माहिती मला मिळाली आणि तरुणाईला एकत्र करून त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव देण्यासाठी गणेशोत्सवाचे महत्त्वही नव्याने अधोरेखीत झाले. म्हणजेच या उत्सवात समाजातील तरुणाईला, त्यांच्यातील ऊर्जेच्या, इच्छाशक्तीला विधायक वळण देण्याची ताकद आहे, हे मान्य करावेच लागेल.

गणेशोत्सव ही नेतृत्वगुण निर्माण करणारी शाळाच आहे, असेही आपण म्हणू शकतो. भारताच्या पारतंत्र्याच्या काळात विविध चळवळी, आंदोलन यामध्ये तरुण भाग घ्यायचे. त्यातूनच देशाला नेते मिळाले; जे स्वातंत्र्यानंतर राजकारणात आले, मंत्री झाले आणि देशाचा कारभार सांभाळला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आंदोलने वा चळवळींचे प्रमाण पूर्वीइतके राहिले नाही. पण गणेशोत्सवामधून कार्यकर्ते निर्माण झाले आणि तरुणांमधील नेतृत्वगुणांचा विकास झाला. नेतृत्वगुण असणारा एखादा मुलगा वा मुलगी अनेकांना मार्गदर्शन करतो. तोच पुढे अनेकदा नगरसेवक, आमदार, खासदार झाल्याचे सांगता येईल. शेवटी अंगी नेतृत्वगुण असणाऱ्या माणसाला कुठेतरी वाव मिळणे गरजेचे असते. त्यांची ही गरज गणेशोत्सवाच्या निमित्ताने मिळते हीदेखील एक सकारात्मक बाब म्हणावी लागेल.

काळानुरूप प्रत्येक गोष्ट बदलते. साहजिकच येत्या काळात या उत्सवाचे स्वरूप बदलणेही गरजेचे आहे. यापुढे गणेश मंडळांनी वा या उत्सवाचा भाग होणाऱ्या सगळ्यांनीच पर्यावरणाचे भान राखणे गरजेचे आहे. हा उत्सव अधिक पर्यावरणपूरक व्हायला हवा. भाऊ रंगारी मंडळाची गणेशमूर्ती बघितली, तर तो गणेश राक्षसाचा वध करताना दिसतो. भाऊ रंगारी स्वत: क्रांतिकारी विचारांचे असल्यामुळे तसेच सशस्त्र क्रांतीला त्यांनी प्रोत्साहन दिले असल्यामुळे उघडपणे बोलता येत नसलेले त्यांनी या मूर्तीतून दाखवण्याचा प्रयत्न केला होता. इंग्रजरूपी राक्षसाचा वध करण्यासाठी गणपतीप्रमाणे आपल्यालाही हातात शस्त्र घ्यावे लागेल, असे त्यांचे सांगणे होते. मात्र आज मी त्या मूर्तीकडे बघतो तेव्हा मनात येते की, आता काळ बदलला आहे. राक्षसही बदलले आहेत. त्यामुळेच आताच्या राक्षसांचा वध करण्यासाठी शस्त्रदेखील बदलायला हवीत. आता पर्यावरणाची हानी, अस्वच्छता, अज्ञान या बाबी राक्षसासमान आहेत. त्यामुळेच त्यांचा वध करण्यासाठी आता आपल्याला वेगळ्या शस्त्रांचा वापर करावा लागेल. ते घेऊन वाटचाल करावी लागेल. आता गणेशभक्तांनी हा विचार करायला हवा. गणपती नसताना रस्ते गर्दीने दुथडी भरून वाहत असतील, तर आता मोठे मंडप टाकणे गरजेचे आहे का, याचा अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. मंडपांचा आकार कमी करून विधायक कामांना भर दिला, तर पुढील गणेशोत्सव अधिक देखणा आणि प्रबोधक होईल याची खात्री वाटते.

मोहन शेटे : इतिहास अभ्यासक
(लेखक 'इतिहासप्रेमी मंडळ' या संस्थेचे अध्यक्ष आहेत.)
(शब्दांकन: स्वाती पेशवे)

खरेदीचे बदलते मार्ग; वाण्याचे दुकान ते मॉल कल्चर

चकचकीत वास्तू, प्रेझेंटिंगचे कौशल्य, खरेदीतला मोकळेपणा आणि हसतमुख सेल्समन/वुमन असले तरी त्यांचे मर्यादित मार्केटिंग यामुळे ही मॉल संस्कृती ग्राहकांच्या पसंतीला उतरत आहे. अनेकदा या मॉल्समध्ये सवलतीच्या दरात वस्तू विक्री होते. त्यामुळे ग्राहकांच्या पैशाची बचत होते. तेच बरेचदा वाण्याच्या दुकानात मिळत नाही. या मोठाल्या शॉपिंग मॉल्समध्ये तुम्ही एकाच छताखाली सर्व काही खरेदी करू शकता. मग ते ब्रँडेड कपडे, किराणा सामान, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू किंवा अगदी शूज असोत. आपण असे म्हणू शकतो की, मॉल्सने भारतीयांच्या खरेदीचा मार्ग पूर्णपणे बदलला आहे.

काही वर्षांपूर्वीपर्यंत आपली आई घरातील वस्तू घेण्यासाठी वाण्याच्या 'किराणा दुकानात' जात असे, पण सध्याच्या काळात किराणा दुकानांची जागा या मॉल्सने घेतली आहे. हे सारे बदल होत असूनही, कुटुंबांच्या दैनंदिन गरजा भागवणारी काही किराणा दुकाने अजूनही दिसतात. मॉल, सामान्य बाजारपेठ, आठवडी बाजार यांच्या संस्कृतीत बरेच फरक आहेत. सर्वसामान्य बाजारपेठेत गरिबांपासून श्रीमंतापर्यंत प्रत्येक वर्गातील व्यक्ती आपल्या सोयीनुसार खरेदी करतात, तर मॉलमध्ये विशिष्ट वर्गाच्या लोकांचीच संख्या जास्त दिसते. त्यामुळे वाण्याचे दुकान आजही पाय रोवून उभे आहे आणि राहील. ही मॉल संस्कृती फोफावली असली तरी आता तर खरेदीच्या पद्धतीत ऑनलाइन खरेदीने हा 'खरेदीचा मार्ग' आणखीनच आमूलाग्र बदलला आहे. असो. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्याची गरज लक्षा घेता ही मॉल संस्कृती तरुणाईच्या पसंतीला उतरत असली तरी बाजारपेठा, रस्त्यांवरील खाऊगल्ल्या, छोटी-मोठी दुकाने येथेही खरेदीला गर्दी होते, हेही खरे आहे. ऑनलाइन खरेदीही वाढ झाली असली तरी मॉल संस्कृतीने मध्यमवर्गीय आणि निम्नवर्गीय लोकांना प्रचंड आकर्षित केले आहे. भविष्यात ऑनलाइन खरेदी किंवा मॉल कल्चर कितीही एस्टॅब्लिश झाले तरी वाण्याचे दुकान विसरता येणार नाही व त्याला मरण नाही, हेही तितकेच खरे.

समाप्त:
- ज्योत्स्ना कोट- बाबडे

शब्दकोडे-१९०

आडवे शब्द
१. दिवसाची चाकोरी (ला.) ५. तडीपार ७. बहुदा उसने बळ ९. जुगाराचा एक प्रकार १०. अमावस्या ११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग १२. गंध १४. नजरकैद, अटक १६. योग्य, बरोबर १८. संताप १९. रूक्ष, कोरडे २२. सेवक २३. मृत्यू नसलेला २४. बातमी २५. उत्तरदायित्व, जोखीम २७. किरकोळ सामान ३०. भार, बोजा ३१. शेवटचा पांडव ३३. गाडीचे छत ३५. विजार ३६. वरपांगी ३८. वटवट, त्रास ३९. पदर ४१. दरवाजा ४२. आरोप ४३. सवय, उत्तर दिशा ४४. देवाण-घेवाण ४८. आस, अक्ष ४९. बडबड्या ५०. प्रेत ५२. निवासस्थान ५३. सर्वांना सारखे प्रमाण ५५. रेचक ५६. वागणूक ५७. किंमत ५८. नवीन आलेला ६०. लहानच्या विरुद्ध ६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६२. दिवसभराचे एकूण काम ६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला? ६६. भांडण ६७. मस्ती, जोम ६८. पोते शिवण्याची जाड सुई ६९. खोदकाम ७१. पोपट ७३. सैन्याचा दाणागोटा ७४. वाळवी, उणीव ७५. अनौपचारिक सहभोजन

उभे शब्द
१. रम्य २. बाजार ३. बंगाली रुपाया ४. घर सोडून निघून जाणे ५. मावळ्यांची युद्धातील घोषणा ६. मर्यादा ७. स्थिती, दशा ८. वस्त्र, कापड ११. मध्यम प्रमाण १३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का' १५. सह, सोबत १७. थापा मारणारा २०. आवाजातील घोगरेणा २१. सज्ज २२. मोठा भाऊ २४. धडपड, प्रयत्न २५. आजूबाजूला २६. पावाचा गोल प्रकार २८. धडक २९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा ३१. संतोष आनंद ३२. आशीर्वाद ३४. अंदाज, तर्क ३७. नवरदेव ४०. चटकन ४२. सजावट ४४. अवडंबर, धैर्य ४५. उंबरठा ४६. सचिव, मुख्य ४७. किंमत ४८. अंब्याचे मिष्टान्न ४९. चणचण, न्यूनता ५१. मुलगा किंवा मुलगी ५३. चांगली वागणूक ५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ. ५५. धनको ५९. मरेपर्यंत ६०. मोजणी ६१. हास्याचे पीक ६३. सुसर ६४. उत्सव ६५. फुलातील पुंकेसर ७०. पुरुष ७२. वैताग (ला.)



शब्दकोडे १८९ चे उत्तर

आडवे उत्तर
१.वारसदार ६.आळस ८.माणिकमोती ११.पसायदान १२.मनन १३.रत १४.वेताळ १६.धमक १७.कप १९.लकब २१.समाधान २३.मार २५.रसद २७.मानव २९.वानवा ३०.भविष्यकाळ ३२.वास ३३.कनक ३४.ईश्वर ३७.मना ३८.सलगी ४०.नरवर ४१.पाचक ४३.कव ४५.अनवाणी ४७.चटकन ५०.काळाभिन्न ५२.जनम ५४.नस ५५.दासनवमी ५८.हार ५९.रवाळ ६१.कापड ६३.नर ६४.सानविवि ६६.पत ६७.वर ६९.बन्सी ७०.समर ७२.तलमसुती ७४.रमल ७६.पाळणे ७७.पुणेकर ७८.माल ८०.कायरस ८३.वासरू ८४.सावधान ८५.चंपक

उभे उत्तर
१.वापर २.रसातल ३.सय ४.दादा ५.रनवे ६.आभाळ ७.समसमान ८.मानधन ९.कटकट १०.तीरकमान १५.ताकद १८.परवानगी २०.बरका २१.समास २२.धावणे २४.लाभ २६.सळई २८.हकनाक २९.वाकस ३१.विसरभोळा ३२.वार ३५.वचन ३६.नीच ३९.लचक ४१.पाणी ४२.कफन ४४.वचन ४५.अन्नदान ४६.वाचन ४८.टसर ४९.नकळत ५०.कावकाव ५१.कवाड ५२.जमीनदार ५३.महाविद्यालय ५६.सरबती ५७.वसा ६०.वापरणे ६२.परतणे ६५.आसपास ६८.समरस ७१.मळ ७३.लकवा ७५.मकान ७७.पुन्हा ७८.मासा ७९.लव ८१.रस्ता ८२.सक

सोभाव (सुत्र १२)
मानूसनी चांगला ईचार करानं नियोजन कराले जोयजे.

डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसना मनमा त्याच त्या ईचार सारखा येत -हायनात ते त्यान कारन मानूसले आपल सोतानं आस खास नियोजन करता उनं नै.यान्ही सदा चिंता वाटस नै ते त्याले चांगला ईचार करानी सवय लागत नै. तो पयले पासून परिनाम कारक चिंता करांनी त्याले सवय पडेल -हास तीच तो शिकस.धाकलपने जी वस्तू समोर दिसत ती पटकन उचलस नै ते ती उचलाना करता धडपड करस. जर ती त्याले सहज मियनी नै ते तो रडाले लागस तधय त्याले मियस.पुढे ती वस्तू मांगाले लागस आनी लेस.जर त्याले शंका वाटनी ते समोरनाना डोया चुकाडीशी लेस.याच सवयी त्याले त्याना वाढत्या वयनाबरोबर पायबंद पडत जातीस.आनी जवय

ते मांगीसनी मियत नै ते ज्याले त्यानच मियन लागस.आनी काही परसंगले ते मियत नै धडपड वाया जास या गोष्टी सना मानूसले जवय सोताना अनुभव येऊ लागथस तवय त्याना , जीवनक्रमा फरक पडत खरा पन हाऊ बदल त्याना या जीवनना बुध्द्या घडायेल असत नै.त्यामुये धाकलपने ज्या सवयी आदत लागतीस जे जोयजे ते मियन,ह्याच सवयीनना संस्कार असाव्हस की ती वस्तू मियेपर्यंत ती वारंवार मनमा येस. परंतु ती हमेशा मनमाड का येस हाई समजाले नै ते मनमा घोयत -हावामुये जसं जोयजे तसं घडत नै.तव्हय जोयजे ते कसं मियन पडीन नै ते त्यापेक्षा काही दुसरं मियनाकरता आनखीन जास्त काही चांगल शे कां असा ईचार पुढे वाढत्यावयना बरोबर कराले तो शिकस नै ते त्याले शिकाडानी गरज पडस त्या रीतना ईचार कसा करवा हायी माहित -हात नै. त्यामुये एकदा मनमा गोष्ट उनी की ती कशी मियीन आनी मियेपर्यंत तो हमेशा मनम्हा तो परसंग सारखा घोयत ठेवस.मूल वस्तू मियनी की ती खाले टाकस आनी त्याले तीना याद बी येत नै.आनी दुसरी समोर येताच तिना मांगे तो लागस.पुढे जसं वय वाढत जास तवय मनसारख क्वचित घडस म्हनीसन पुढे तीच गोष्ट लेवानी सवय लागस.म्हातरपने धरडपने याच गोष्टी सना अतिरेक व्हस.चिंतन हाईच मनना गुन समजावस परंतु हाऊ मनना गुन जन्मसिद्ध -हात नै.तो वर सांगेल परमाने परिस्थितीमाहीन जनमले येयेल -हास.कोठे यांनी याद पडनी अशी जीवनमा यशस्वी व्हयेल मानसे देवाले भलताच थोडा भेटतस.पन अपयशी मानूस ती गोष्ट मनम्हा घोयत -हास. त्यामुये परसंगले तो समद सांगाले लागस.ज्याना फार योजना नियोजनामक चिंता वा ईचारकरानी सवय -हास त्या मन्हमा सारख घोयत -हातस .तो रोग दिखायी देत नै.जीवनमातल अपयश आनी बुध्दीवर ईचारन्या रीतीस्ना, संस्कार ना अभाव ह्यामुये मानूसन मन चंचल आनी त्याच त्या घोयना-या गोष्टी दिखायी देतीस.हाऊच मनना धर्म शे.असा भ्रम समदा ठिकाने देखाले मइयस.पन हाऊ मनना धर्म -हात नै.तो मनवर एक परिस्थितीना परिनाम शे.

– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

मेरी माटी मेरा देश अभियानातून साकारणार राष्ट्रीय एकात्मतेचं प्रतीक अमृत वाटिका

केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार

नाशिक । प्रतिनीधी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'मेरी माटी मेरा देश' हे अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातून मातीचे कलश जिल्हा प्रशानाच्यावतीने दिल्ली येथे पाठविण्यात येणार असून तेथे साकारण्यात येणारे अमृत वाटिका हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असणार आहे. असे प्रतिपादन दळवट येथे आयोजित कार्यक्रमात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ भारती पवार यांनी केले असल्याचे शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

सुशोभित केलेल्या मातीच्या कलशामध्ये आदिवासी बंधू-भगिनींकडून परिसरातील मातीचे संकलन करण्यात आले. यामध्ये ज्या आदिवासी बांधवांना शेतजमीन आहे त्यांनी संकल्पनेनुसार कलशामध्ये माती टाकली तर ज्या नागरिकांना स्वतःची शेत जमीन नाही त्यांनी चिमूटभर तांदूळ या कलशामध्ये टाकून आपला सहभाग नोंदवला. दिल्ली येथे निर्माण होणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक, हुतात्मे आणि शहीद जवान यांच्या स्मारकासाठी हा मातीचा कलश जिल्हा प्रशासनाकडून जाणार आहे. केंद्र सरकारने ' एक भारत, श्रेष्ठ भारत ' या भावनेने दिल्ली आणि ७ हजार ५०० गावांमध्ये देशी आणि स्थानिक वनस्पतींचे उद्यान उभारण्यासाठी 'अमृत वाटिका' योजना सुरू केली आहे. 'मेरी माटी, मेरा देश ' या अभियानांतर्गत देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ ग्रामपंचायतींमध्ये 'शिलाफलकम' स्मृती फलकही लावण्यात आले आहेत.

मातीचा कलश घेऊन डॉ.भारती पवार यांच्यासह आदिवासी बांधवांनी पारंपारिक आदिवासी वाद्यांच्या तालात आपली परंपरा सांभाळत लोककलेच्या माध्यमातून नृत्य करत परिसरातून मिरवणूक काढली. यावेळी आदिवासी बांधवांबरोबर राज्यमंत्री डॉ. पवार यांनी देखील नृत्यामध्ये सहभागी होऊन ढोल वादनाचाही आनंद घेऊन हा कार्यक्रम उत्साहात संपन्न केला. यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी बांधव या मोहिमेत सहभागी झाले होते, असेही प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

बांधकाम अभियंते घेणार प्लंबिंगचे धडे

आयपीपीएलचे उद्घाटन

नाशिक । प्रतिनिधी

प्लंबिंगला बांधकाम क्षेत्रात महत्वाचे स्थान असून इमारतीच्या आयुष्य वाढीसाठी सुयोग्य प्लंबिंग आवश्यक आहे. इंडियन प्लंबिंग असोसिएशन ही संस्था प्लंबिंग क्षेत्रात जनजागृती तसेच नवीन तंत्रज्ञान व योग्य प्लंबिंगचे महत्व यावर मोलाचे कार्य करत असल्याचे प्रतिपादन क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी केले. ते इंडियन प्लंबिंग असोसिएशनच्या नाशिक चॅप्टरद्वारे आयोजित या प्रशिक्षण व प्रश्नमंजुषा स्पर्धा असे स्वरूप असलेल्या इंडियन प्लंबिंग प्रोफेशनल लीग (आयपीपीएल) च्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या उपक्रमाचे हे सातवे वर्ष आहे. याप्रसंगी मंचावर गुरु गोविंद फाऊंडेशनचे प्रशांत चव्हाण , इंडियन प्लंबिंग असोसिएशनच्या नाशिक चॅप्टरचे अध्यक्ष मिलिंद शेटे, उपाध्यक्ष जयंत भिंगे, समन्वयक चिन्मय देशपांडे हे मान्यवर उपस्थित होते. या लीगबाबत अधिक माहिती देतांना मिलिंद शेटे म्हणाले की, प्लंबिंगच्या तंत्रज्ञानामध्ये अनेक बदल होत आहेत. या बदलांची बांधकाम क्षेत्रात योग्य सांगड घालण्यासाठी अशा उपक्रमांचा निश्चित उपयोग होतो. या अंतर्गत प्रशिक्षण व नंतर त्या प्रशिक्षणावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात येते.

या वर्षी खालील संघ यात सहभागी झाले असून त्यांची नवे अशी- मयुरेश कन्स्ट्रक्शन्स, नासा कन्स्ट्रक्शन्स, पाटील -शहा हाउसिंग कंपनी, डेल्टा एन्व्हायरो, मुक्ता प्लंबिंग इन्जिनिअर्स अँड कॉन्टर्क्टर, एबीएच डेव्हलपर्स, श्रीजी डेव्हलपर्स, हर्ष कन्स्ट्रक्शन्स, सम्राट ग्रूप, पार्कसाईट ग्रूप, श्रीयोग बिल्डर्स, ग्रप काऊंटी, माधव विठ्ठल रियलिटी प्रायवेट लिमीटेड व अनमोल नयनतारा ग्रूप.

ही लीग यशस्वी करण्यासाठी अनिल अरगडे, सोमनाथ क्षीरसागर, शिवाजी हांडे आदी सदस्य प्रयत्नशील आहेत.

एबीव्हीपी, नाशिक प्लोगर्स यांच्या माध्यमातून २५२६ गणेश मूर्तींचे संकलन

नाशिक । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नाशिक महानगराच्या माध्यमातून गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने गोदावरी घाट परिसर, रामकुंड येथे गणेश मूर्ती, निर्माल्य संकलन आणि गोदावरी परिसर स्वच्छता अनंत चतुर्थीला करण्यात येते. यावर्षीही पर्यावरण विषयात काम करणाऱ्या नाशिक प्लोगर्स या संस्थेचे स्वयंसेवक देखील या अभियानात सहभागी झाले होते. या अभियानाच्या माध्यमातून २५२६ गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले.

डॉ. प्रियंका झंवर श्री महावीर एज्यु. सोसायटीच्या संचालकपदी

नाशिक । प्रतिनिधी

श्री महावीर एज्युकेशन सोसायटीच्या संचालकपदी डॉ. प्रियंका झंवर यांची नियुक्ती झाल्याची अधिकृत घोषणा संस्थेचे अध्यक्ष हरीश संघवी यांनी केली आहे.

डॉ. प्रियंका झंवर यांनी यापूर्वी संस्थेचे समन्वयक आणि डीन म्हणून काम केले आहे. आता संचालक म्हणून त्यांची नवीन भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. त्यांची या महत्त्वपूर्ण पदावरील पदोन्नती त्यांच्या कामाप्रती त्यांचे समर्पण त्यांचे शिक्षण आणि त्यांच्या सोसायटीच्या नेतृत्वासाठी अतुलनीय बांधिलकी यामुळे झाली आहे.

श्री महावीर एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या संघवी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, महावीर

पॉलिटेक्निक, महावीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी डी फार्म तसेच महावीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बी.फार्मसी या चार महाविद्यालयांचे व्यवस्थापन त्या यापदाहून करणार आहे.

श्री महावीर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन हरीश संघवी आणि व्यवस्थापकीय विश्वस्त राहुल संघवी यांनी या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आणि त्यांच्या बढतीबद्दल अभिनंदन केले आहे.

प्रोसेज जमा — ॲड. सागर एस. जैन, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे कोर्टात

दि.कि. अर्ज क्रं. ११४३/२०२३

श्री. मोहन रामदास पाटील ..अर्जदार
।। विरुध्द ।।
कै. रामदास लाला पाटील (मयत) ...जाबदेणार

मुंबई रेग्युलेशन १८२७ ॲक्ट (भाग VIII) प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज.

या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज केला आहे. मयत कै. रामदास लाला पाटील हे मौजे जुनवणे, ता.जि. धुळे येथे दि. ३१/८/२०२१ रोजी मयत झाले आहेत त्यांचे वारसांनी कायदेशीर वारस म्हणून धुळे मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेसाठी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग VIII प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.२

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि.०२/११/२०२३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर वारस दाखला बाबत कोणाचीही हरकत/म्हणणे असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी ११.०० वाजता स्वतः अथवा वकिलामार्फत धुळे मे.७ वे सह दिवाणी न्यायाधीश सा. क. स्तर यांचे कोर्टात हजर होवून लेखी हरकत घ्यावी.

सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाज पुर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल. कळावे,

आज दि. २६/०९/२०२३ रोजी आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

धुळे
दि. २६/०९/२०२३ — आदेशावरुन

कामगिरी कारकुन, मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर, धुळे

आरक्षणासाठी नाथपंथी भटका समाज आंदोलनाच्या पवित्र्यात

१ ऑक्टोबरला राज्यस्तरीय बैठक

नाशिक । प्रतिनिधी

आरक्षणासाठी आता नाथपंथी भटका समाजदेखील आता आंदोलनाच्या पवित्र्यात आला आहे. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नाशिकसह राज्यातील प्रमुख सदस्यांची बैठक छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती मंगल कार्यालय, पिसादेवी रोड, हरसूळ या ठिकाणी आयोजित केली आहे. बैठकीत संघर्ष समितीची निवड केली जाणार असून, पुढील रणनीती ठरविण्यात येणार आहे.

राज्यात आरक्षणाचा मुद्दा सर्वच समाजाने उचलून धरला असून, वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर नाथपंथी समाजाची एकजूट व्हावी आणि त्यातून संघर्षाची चळवळ उभी करण्यासाठी महाराष्ट्रातील नाथपंथी समाजात येणाऱ्या जाती-पोटजातीतील प्रमुख सदस्यांची महत्वाची बैठक छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

हभप दिनकरराव खांडबहाले यांची नशिक वारकरी मंडळ तालुकाध्यक्षपदी निवड

नाशिक । प्रतिनिधी

अखिल भाविक वारकरी मंडळ नाशिक तालुकाध्यक्षपदी महिरावणीचे सामाजिक कार्यकर्ते पंढरीचे वारकरी व संप्रदायाचे निष्ठावंत पाईक हभप दिनकरराव महाराज खांडबहाले यांची नाशिक जिल्हाध्यक्ष हभपश्री अशोक महाराज गांगुर्डे सोग्रसकर यांनी नुकतीच निवड केली आहे. राज्य संपर्क प्रमुख हभप आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी त्यांचे अभिनंदन

करुन सत्कार केला. सचिवपदी हभप देवराम महाराज भावले, संघटक हभपश्री भास्कर महाराज ढगे, जिल्हा संपर्कप्रमुख हभप शिवाजी महाराज खांडबहाले विभागीय अध्यक्ष सातपूर हभपश्री सुनिल महाराज निघोट, महिला समिती नाशिक जिल्हा अध्यक्ष हभपसौ सुमनताई बाळासाहेब शिंदे धृवनगर यांचा गौरव हभप शिवाजी महाराज खांडबहाले, हभप दिनकर महाराज खांडबहाले, हभप भास्कर महाराज ढगे यांच्या हस्ते करण्यात आला. नाशिक तालुका भाविक वारकरी मंडळ पदाधिकारी आणि गांव तेथे वारकरी मंडळाची समिती लवकरच जाहीर करु असे हभपश्री दिनकर खांडबहाले यांनी यावेळी आश्वासित केले.

नाशिक मनपाने केले २ लाख गणेश मूर्तींचे संकलन

नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

नाशिक । प्रतिनिधी

श्री गणेशोत्सव पर्यावरणपूरक होण्यासाठी नाशिक महापालिकेमार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्यात. यासमवेतच पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करणेच्या दृष्टीने नागरीकांचा जास्तीत-जास्त सहभाग व्हावा याकरीता विविध उपक्रम देखील राबविण्यात आल्या.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने नदीपात्रांचे जल प्रदुषण होऊ नये याकरीता श्री मुर्ती दान करणे व निर्माल्य संकलित करणे याकरीता नाशिक महापालिकेने नागरीकांना केलेल्या आवाहनास नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. दहाव्या दिवसाच्या श्री गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने नागरीकांनी उत्स्फुर्तपणे गणेश मुर्ती दान करून व निर्माल्य जमा करून मनपास मोलाचे सहकार्य केले. मनपा कार्यक्षेत्रातील सहा प्रशासकीय विभागातील कार्यक्षेत्रातील श्री विसर्जनाचे विविध ठिकाणांहून तब्बल २ लाख २५३ श्री मुर्तींचे संकलन करण्यात आले. यात

विभाग निहाय श्री मुर्ती संकलन संख्या

पंचवटी - ७७३२९, नविन नाशिक - २४६१६, नाशिकरोड - ४२०९६, ना.पुर्व - १४७६५, सातपूर - ३०३३० आणि

ना.पश्चिम - १११११७ अशी आहे.

तसेच, नाशिक मनपा कार्यक्षेत्रातील विविध विसर्जन ठिकाणांहून एकूण १५३.१५५ मे.टन निर्माल्य संकलन झाले. त्याचप्रमाणे मनपातर्फे नागरिकांना विसर्जनाकरिता ९५३.५ किलो अमोनियम बायकार्बोनेट पावडरचे वाटप करण्यात आले. मागील वर्षी एकूण २०६,००० गणेश मूर्तींचे व १४४ टन निर्माल्य संकलन करण्यात आले होते. परंतु यावर्षी पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या मनपाच्या प्रयत्नास शहरातील नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देऊन मोठ्या प्रमाणावर शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करून घरीच विसर्जन केले.

गणेश मूर्ती संकलनासाठी मनपास संघर्ष करियर अकॅडमी, बिटको कॉलेज, एनसीसी कॅडेट्स, सह्याद्री प्रतिष्ठान, के. व्ही. नाईक कॉलेज, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, के. के. वाघ अभियांत्रिकी कॉलेज, मविप्र कॉलेज, संदीप फाऊंडेशन, महावीर पॉलीटेक्निक, स्वप्नपूर्ती फौंडेशन, रोटरी क्लब या संस्थानी सहकार्य केले.

निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १०९४/२०२३

लोटन बारकु पाटील वगैरे ३ क ..अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ...सामनेवाला
जनाबाई बारकु उर्फ बारीकराव पाटील
मृत्युसमयी पत्ता:- जुनवणे ता.जि.धुळे ..मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. सो. धुळे यांचे कडे दि.०८/०९/२०२३ रोजी कि. दि. अर्ज. नं. १०९४/२०२३ चा अर्ज मयत जनाबाई बारकु उर्फ बारीकराव पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १६/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ७ सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०८/०९/२०२३ — आदेशावरुन

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर, धुळे

प्रोसेज जमा — ॲड.राकेश अशोक मोरे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कार्टात

दिवाणी कि. अर्ज. नं. ११३६/२०२३

शेख मुश्ताक मोहमंद शफी
रा. निशांत चौक, गल्ली नं. ७, मच्छीबाजार धुळे, ता. जि. धुळे. ...अर्जदार
।। विरुध्द ।।
मा. शाखा प्रबंधक, सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, शाखा धुळे
पत्ता : गल्ली नं. ४, धुळे, ...सामनेवाला
शमीम बानो मुश्ताक शेख ...मयत

उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेसाठी
(Succession Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची पत्नी मयत शमीम बानो मुश्ताक शेख यांचे सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, शाखा-धुळे येथील बचत खाते क्र. ३१००२८६९२६ मध्ये जमा असलेली रक्कम रुपये ५६,५२२/- (अक्षरी रुपये छप्पन्न हजार पाचशे बावीस मात्र) सदर रक्कम मिळणेसाठी भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ९. यांचे कोर्टात दिनांक ४/११/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वत: किंवा वकीलांमार्फत / प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत शमीम बानो मुश्ताक शेख यांचे कायदेशिर वारस म्हणुन भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.२६/०९/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे

ढोल-ताशा, नंतर डॉल्बीचा दणदणाट, गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात संपन्न

धुळे । प्रतिनिधी

अमाप उत्साह, बारा पावलीचा गजर, डीजेचा दणदणाटासह गणेश विसर्जन मिरवणूक रात्री संपली. शांततेत लाडक्या गणरायाला नाशिककरांनी भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. यावेळी विसर्जन मार्गावर प्रचंड संख्येने धुळेकरांची उपस्थिती पाहायला मिळाली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशी साद घालत गणरायाला साश्रू नयनांनी धुळेकरांनी निरोप दिला.

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...अर्धा लाडू फुटला, गणपती बाप्पा उठला... अशा जयघोषाने गणपतीबाप्पाला सर्वत्र निरोप दिला. मोठ्या आग्रा रोडवर विसर्जन मिरवणुकांचे स्वागत करण्यासाठी सर्व पक्षीय नेत्यांकडून जोरदार तयारी करण्यात आली होती. तसेच निर्विघ्न कार्य पार पडण्यासाठी पोलीस दलही ॲक्टीव्ह होते. महापालिकेकडून गणेश विसर्जनासाठी दहा ठिकाणी व्यवस्था करण्यात आली होती. गणेश विसर्जनानिमित्त आज सर्वत्र ढोल-ताशा या पारंपारीक वाद्यांसह डिजेचा दणदणाट ऐकायला मिळत होता. गणयाची भक्तीगिते व जयघोषाने सर्वत्र चैतन्याचे वातावरण होते. लहान मंडळांनी सकाळी काढलेल्या विसर्जन मिरवणुकीत गणेशभक्तांनी पारंपारिक वाद्यांच्या तालावर ठेका धरला होता. शिस्तबध्दपणे या मिरवणुका विसर्जनस्थळी दाखल होत होत्या. गणेशमंडळांकडून वाजत-गाजत व भक्तीमय वातावरणात लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेल्या जूने धुळेतील मानाचा खुनी गणपतीची पालखी मिरणूक सर्वात अगोदर निघाली. ही मिरवणूक सायंकाळी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान खुनी मशिदीजवळ आल्यानंतर अजाण व गणरायाची आरती एकाचवेळी झाली. यावेळी मुस्लिम बांधवांच्या वतीने परंपरेप्रमाणे गणरायाच्या पालखीवर पुष्पवृष्टी केली. हे दृष्ट पहाण्यासाठी प्रचंड गर्दी होते. टाळ मृदंगाच्या गजरात, वारकरी व भजनी मंडळासोबत ही मिरवणूक आग्रारोडमार्गे पांझरा नदीपात्राकडे मार्गस्थ झाली. त्यापाठोपाठ शहरातील मोठ्या गणेशमंडळांच्या विसर्जन मिरवणुका निघाल्या. या मिरवणुकांचे स्वागत करण्यासाठी आग्रारोडवर राजकीय, सामाजिक संस्थांकडून स्वागत कक्ष उभारण्यात आले होते. महापालिकेने पांझरा नदीकिनारी उभारलेल्या तात्पुरत्या कुंडांसह हत्तीडोहवर श्रींचे विसर्जन करण्यासाठी सकाळपासून भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. लहान लहान मंडळे तसेच घरगुती गणरायांचे सकाळपासून सुरु झालेले विसर्जन रात्रीपर्यंत सुरु होते. मोठ्या मिरवणुकांना दुपारनंतर प्रारंभ झाला. ढोलताशाच्या पारंपारिक वाद्यासह डिजेच्या तालावर थिरकत बाप्पांना तरुणाईने निरोप

दिला. जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सर्वत्र कडोकोट पोलीस बंदोबस्त तैनात होता.

मनपाकडून ४ ते ५ टन निर्माल्य संकलन!

गणेश विसर्जनासाठी महापालिकेने सुमारे पावणेतीनशे कर्मचार्यांची नियुक्ती केली होती. विसर्जनस्थळी गणेशमुर्तींसह निर्माल्य संकलन करण्यासाठी २५ ते ३० वाहनांची व्यवस्था करण्यात आली. काल दिवसभरात सुमारे चार ते पाच टन निर्माल्याचे संकलन करण्यात आले. हत्ती डोह, कुमार नगर व दाता सरकारजवळ नदीकिनारी सर्वाधिक गणेशमुर्तींचे विसर्जन झाले. यासाठी मनपातर्फे कृत्रीम हौद ठेवण्यात आले होते. महापौर प्रतिभा चौधरी, मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त डॉ.संगिता नांदुरकर, उपायुक्त विजय सनेर यांच्या मार्गदर्शनात मुख्य स्वच्छता निरीक्षक आर.एम.वसावे, लक्ष्मण पाटील, चंद्रकांत जाधव यांच्यासह मनपाचे सुमारे पावणेतीनशे कर्मचारी रात्री उशीरापर्यंत कर्तव्य बजावत होते.

माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांच्यातर्फे गणेशभक्तांसाठी भंडारा

गणपती विसर्जन मिरवणुकीतील सहभागी झालेल्या गणेशभक्तांसाठी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी स्व. राजमाता पद्माराजे रघुजीराव कदमबांडे यांच्या स्मरणार्थ महात्मा गांधी चौकात भंडार्याचे आयोजन केले होते. यावेळी उपस्थित माजी आ.कदमबांडे यांच्यासह गणेश जाधव, सत्यजित सिसोदे, सागर आघाव, ॲड. गोपीसागर धिवरे, सुनिल कदमबांडे, भूषण काकडे, दीपक लोखंडे, हरिष परदेशी, अंकूश पाटील, सुभाष बाबर, शेखर परदेशी, आनंद बंग, दिलीप परदेशी, रमेश बंग, सिध्देश गौरी, ललित पाटील, भावेश चावडा, पिंटू श्रीमान तसेच नवयुवक मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

चोख पोलीस बंदोबस्त!

अनंत चतुदर्शी व मुस्लिम बांधवांचा ईदए-मिलाद सण असल्याने जिल्हा पोलीस दलाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक, अपर पोलीस अधीक्षक, २ उपविभागीय पोलीस अधिकारी, १५ पोलीस निरीक्षक, ६७ सहायक पोलीस निरीक्षक, १२३० पोलीस अंमलदार, ७०० पुरुष होमगार्ड, १०० महिला होमगार्ड, एसआरपीएफ १ कंपनी, ४ सीआरपीएफ पथक, २ क्युआरटी पथक, ४ स्ट्रैकिंग पथक, साध्या वेशातील १० पोलीस पथके तैनात होते.

राजकीय पक्षांकडून स्वागत!

विसर्जन मिरवणुकांचे स्वागत करण्यासाठी आग्रारोडवर राजकीय, सामाजिक संस्थांकडून स्वागत मंच उभारण्यात आले होते. यात भाजपच्या मंचावर खा.डॉ.सुभाष भामरे, महानगर प्रमुख गजेंद्र अंपळकर, ओम खंडेलवाल, महिला जिल्हाध्यक्षा वैशाली शिरसाठ, भाजयुमो अध्यक्ष आकाश परदेशी आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेना (उबाठा) च्या मंचावर सहसंपर्क प्रमुख हिलाल माळी, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, महानगरप्रमुख डॉ. सुशील महाजन, धीरज पाटील, कैलास मराठे, विनोद जगताप, संदीप सूर्यवंशी, शुभांगी पाटील, गुलाब माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंचावर प्रदेश सरचिटणीस ईर्शादभाई जहागिरदार, जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, राजेंद्र चितोडकर, मनोज जगताप, जया साळुंखे, किशोर चौधरी आदी उपस्थित होते. मनसेच्या मंचावर संजय सोनवणे, ॲड. प्रसाद देशमुख, गौरव गिते, हर्षल परदेशी आदी उपस्थित होते. शिवसेना (शिंदे गट) चे जिल्हाप्रमुख मनोज मोरे, सतिष महाले, संजय वाल्हे, बाळू आगलावे, रजनिश निंबाळकर, निलेश काटे, तुषार सैंदाणे आदी उपस्थित होते. अग्रवाल समाजाच्या मंचावर संदीप अग्रवाल, सुनिल अग्रवाल, अजय अग्रवाल, आकाश अग्रवाल आदी उपस्थित होते. या सर्व पदाधिकार्यांनी गणेश मंडळांचे स्वागत करतानाच गणेशभक्तांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे गणेशभक्तांना पुरी-भाजीचे वाटप करण्यात आले. तर शिवसेना (शिंदे गट) तर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारो गणेशभक्तांनी याचा लाभ घेतला.

दोंडाईचात गणरायाला उत्साहपूर्ण वातावरणात निरोप

दोंडाईचा । प्रतिनिधी

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या महादेवपुरा व डाबरी घरकुल परिसरातील बापजी ग्रुप, श्री शंभोराजे गणेश मंडळ, जय श्रीराम गणेश मंडळ तसेच जय भवानी गणेश मंडळातर्फे विघ्नहर्ता गणरायाला उत्साहपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. विसर्जन मिरवणुकीत अबालवृध्दांसह महिला व

तरुणी पारंपारिक वेशभूषेत फेटा बांधून मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्व गणेशभक्तांनी लेझीमवर ठेका धरला होता. यावेळी तरुणांनी जय श्रीराम...

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर... या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. मिरवणुकीदरम्यान अनुसूचित प्रकार घडु नये म्हणून पोलिस प्रशासन व होमगार्ड पथक यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. शहरातील धार्मिक सलोखा अबाधित राहावा म्हणून बापजी ग्रुपचे संस्थापक कृष्णा नाईक, अध्यक्ष राहुल

आगळे, श्री शंभोराजे गणेश मंडळांचे युवराज पैलवान, जय श्रीराम गणेश मंडळांचे अध्यक्ष रोहित ठाकूर, जय भवानी गणेश मंडळाचे योगेश कोळी यांचे सहकार्य लाभले. दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पीआय श्रीराम पवार व होमगार्ड पथक यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

पारंपारिक वाद्यांवर हजारो तरुणांनी घेतला बारा पावलीचा आनंद

धुळे । प्रतिनिधी

शहरातील गल्ली क्र.६ मधील श्री दत्त भक्त बालगोपाल मित्र मंडळ, कोंडाजी तालीम गणेश मंडळाने आपल्या अनोख्या आणि पारंपारीक मिरवणूकीची परंपरा कायम ठेवली आहे. यंदाही मंडळातर्फे पारंपारीक वाद्यावर गणेश विसर्जन मिरवूणक काढण्यात आली. त्यात हजारो तरूणांनी १२ पावली नाचण्याचा आनंद घेतला. रात्री १२ वाजता ही मिरवणूक गांधी पुतळा चौकात पोहोचल्यानंतर पोलिस प्रशासनाने विशेष सत्कार करीत मंडळाचे कौतूक केले.

कोंडाजी तालीम गणेश मंडळाच्या गणेश विसर्जन मिरवणूकीची सुरवात माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांच्या

हस्ते श्रींची आरती करून करण्यात आली. त्यानंतर श्रींच्या ट्रॉलीचे पूजन करून, नारळ वाढवून मिरवणुकीला सुरवात झाली. याप्रसंगी तालमीचे मार्गदर्शक भगवान कालेवार, दत्तात्रय आखाडे, जितू कल्याणकर, भाऊसाहेब सूर्यवंशी, संजय भारस्कर, बंडू ब्रमे, संजय मराठे, लक्ष्मण चोपडेकर, हरीश पवार, न्हानू भोलाने, रूपक बडगुजर, विकास आखाडे, यशवंत कालेवार तसेच पप्पू डापसे, युवराज कालेवार, गणेश उत्सव समितीचे अध्यक्ष निखिल मोमया, जयेश मगर, बंटी धात्रक, संतोष भारस्कर, सचिन भारस्कर, निलेश काटे आणि मंडळाचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. पारंपारीक वाद्याचा गजर आणि १२ पावली नृत्य अशी ही मिरवणूक जशी जशी पुढे जात गेली तसे तसे मिरवणुकीचे स्वरूप भव्य होत गेले. मंडळाला समाजातील प्रत्येक घटक, सर्व राजकीय पक्षाची नेते मंडळी, पदाधिकारी तसेच मंडळाला देणगी देणारे सर्व देणगीदार, परिसरातील सर्व नागरिक तसेच मंडळाचे सर्व कार्यकर्ते व सर्व मित्र परिवाराचे मंडळाचे युवराज भगवान कालेवार, मार्गदर्शक भगवान कालेवार, मंडळाचे अध्यक्ष निखिल मोमया, कार्याध्यक्ष शशांक (चार्ली) आखाडे, स्वागताध्यक्ष महेश कालेवार, उपाध्यक्ष अजिंक्य धात्रक, यशराज साळुंखे, खजिनदार चेतन धामेचा, सचिव सौरभ भारस्कर, अक्षय गुरव, प्रसिद्धी प्रमुख यश आखाडे, शुभम काळे, करण सूर्यवंशी, पियुष भारस्कर, सजावट प्रमुख जगदीश सोनार, स्वप्नील शर्मा, संपर्क युवराज कालेवार, पप्पू डापसे, जयेश मगर आदींनी जाहिर आभार मानले आहे.

शहरात लूट करणारे दोन चोरटे पोलिसांच्या ताब्यात

धुळे । प्रतिनिधी

धुळे शहर व परिसरात मागील काही दिवसात चोरी व लुटमारीच्या घटना घडल्या आहेत. अशा जबरी चोरी करून लूट करणाऱ्या टोळीतील दोन चोरट्यांच्या धुळे शहर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून मुद्देमाल देखील ताब्यात घेतला आहे. धुळे शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये २१ सप्टेंबर रोजी संध्याकाळच्या सुमारास एका हॉटेल कामगाराची तीन जणांनी रस्त्यात जबरी लूट केली होती. त्यांच्याकडून दुचाकी त्याचबरोबर पाचशे रुपये रोकड व मोबाईल असा ऐवज लंपास केला होता. या घटनेच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास केला असता या गुन्ह्यातील दोन जणांना पकडण्यात पोलिसांना यश आले

मुळचा राजस्थानचा व सध्या अग्रवाल नगरात रहाणार्या उजदलाल जाट या तरूणाला दि. २१ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजेच्या सुमारास लिफ्टच्या बहाण्याने थांबविले आले. सदर तरूणाने दुचाकी थांबविताच त्यास मारहाण करून त्याच्या खिश्यातील ५०० रूपयांच्या रोकडसह दोन हजार रूपये किंमतीचा मोबाईल एकाने हिसकावून पोबारा केला. त्यानंतर दमदाटी करीत दोघांनी त्यास त्याच्याच दुचाकीवर बसवत अग्रेसन चौकापंर्त नेले व तेथे तरूणास उतरवून दुचाकी घेवून ते पळाले होते. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात तिघा चोरट्यांवर दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.अधिक चौकशीत ललित बापू चौधरी (२२) रा.साईदर्शन कॉलनी, धुळे व रमेश राज सोन्नर (१९) रा.पिंजारी चाळ, मिल परिसर, धुळे अशी त्यांनी त्यांची नावे सांगितली. तसेच पिंजारी चाळीत वास्तव्यास असलेल्या भैय्या पिंजारी याच्या सांगण्यावरून सदर गुन्हा केल्याची कबुली त्यांनी दिली. लुटीची घटना घडल्यावर दुचाकीचा वरील नंबर बदलवून एम.एच.१५/बी.एम.४४६६ असा करण्यात आला होता. तसेच लुटीतील मोबाईल हा भैय्या पिंजारी याने घेतला व तो सुरत येथे निघून गेल्याची माहितीही त्यांनी दिली.

लोककलेतून चालतो संसाराचा गाडा

शासनाने मानधन तत्वावर कार्यक्रम राबवावे : कोकणी

चिमठाणे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथे संत सुखाची महाराज गणेश मित्र मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत नंदुरबार जिल्ह्यातील खांडबारा येथील काकरपाडा कोकणी मंडळांच्या कलाकार आपल्या लोककलेच्या माध्यमातून यात्रा उत्सव, विसर्जन मिरवणुक, दिवाळीचे दोन महिने आपल्या कलेच्या माध्यमातून गोंधळ ई कार्यक्रमातून मिळणाऱ्या पैशातून आपला संसाराचा गाडा हाकीत असतात.

याबाबत मंडळाचे अध्यक्ष निलेश कोकणी यांनी मंडळातील २० कलाकार असून काही कलाकार सुशिक्षित असून हे

कलाकार आपल्या वडिलोपार्जित कला सादर करीत आहेत. कलाकारांकडे शेती नाही व शिक्षण ही नाही मात्र या कलेच्या माध्यमातून आपल्या मंडळामार्फत विविध प्रकारचे सोंग तसेच वेशभूषा परिधान करून यात्रा तसेच विसर्जन मिरवणुकीत प्रेक्षकांची करमणूक करतात. यात गणपती हनुमान, शंकर, पार्वती, नंदी, मोर, राम-लक्ष्मण, सोंगाड्या तसेच विविध प्रकारची सोंग व विशिष्ट कपडे परिधान करून या उत्सवाची शोभा वाढवतात व आपल्या पारंपरिक वाद्यांवर नाचकाम करतात. वर्षातून दोन तीनच महिनेच काम असते इतर वेळेस मोलमजूरी आपला उदरनिर्वाह करतात. दिवाळीनंतर आदिवासी यात्रा, रोडारी अहिराणी तसेच आदिवासी कलाकार विसर्जन मिरवणुकीत नाचकाम करून पेक्षकांची मन जिंकत असतात. या कामासाठी या कलाकारांना एका कार्यक्रमाचे २० ते २५ हजार रुपये मिळतात ते कार्यक्रम झाला तर तेथील ग्रामस्थांना कार्यक्रम पसंत पडल्यास दुसऱ्या ठिकाणी बोलवणे येते यातून या कलाकारांच्या उदरनिर्वाह चालतो. मात्र शासनाने आम्हा कलाकारांना ही कला टिकून राहावी यासाठी मानधन तत्वावर कार्यक्रम राबवून मानधन चालू करावे अशी अपेक्षा मंडळाचे अध्यक्ष निलेश कोकणी यांनी भडणे येथे आले असता एका कार्यक्रमात सांगितले.

घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

गणरायांना उदंड उत्साहात निरोप

सर्वत्र कडोकोट पोलीस बंदोबस्त तैनात

धुळे । मानाच्या श्री खुनि गणपतीसह शहरातील लहान-मोठ्या सार्वजनिक मंडळांमध्ये स्थापन असलेल्या गणपतींचे काल उदंड उत्साहात विसर्जन करण्यात आले. श्री खुनि गणरायांना निरोप देण्यासाठी गल्ली-चौकांमध्ये रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. ढोलताशे आणि टाळ मृदुंगाच्या गजरात गणरायांना निरोप देण्यात आला. महापालिकेने पांझरा नदीकिनारी उभारलेल्या तात्पुरत्या कुंडांसह हत्तीडोहवर श्रींचे विसर्जन करण्यासाठी सकाळपासून भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. लहान लहान मंडळे तसेच घरगुती गणरायांचे सकाळपासून सुरु झालेले विसर्जन रात्रीपर्यंत सुरु होते. मोठ्या मिरवणुकांना दुपारनंतर प्रारंभ झाला. ढोलताशाच्या पारंपारिक वाद्यासह डिजेच्या तालावर थिरकत बाप्पांना तरुणाईने निरोप दिला. जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सर्वत्र कडोकोट पोलीस बंदोबस्त तैनात होता. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. खासदार डॉ.सुभाष भामरे, माजी आ.राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रतिभाताई चौधरी यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते यांनी प्रत्येक मंडळास भेट देत विसर्जन मिरवणुकांमध्ये सहभाग घेतला.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

लाडक्या बाप्पाला जल्लोषात निरोप!

राजकीय पक्षांतर्फे गणेश मंडळांचे ठिकठिकाणी स्वागत

धुळे । अनंत चतुर्दशीनिमित्त काल लाडक्या बाप्पाला वाजत-गाजत उत्साहपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. आग्रारोडवरुन काढण्यात आलेल्या विसर्जन मिरवणुकांमध्ये गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तर हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेल्या मानाचा खुनी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. या मिरवुणकीत महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड तसेच असंख्य पदाधिकार्यांनी सहभाग नोंदवला. आग्रारोवरुन डीजे, ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या विविध गणेश मंडळांच्या मिरवणुकांमुळे अवघे शहर दणाणून गेले होते. गणपत्ती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...यासह विविध घोषणांनी परिसरात चैतन्य पसरले होते. राजकीय पक्षांच्या वतीने गणेश मंडळांचे स्वागत करतानाच महाप्रसादाचेही वाटप केले जात होते. शेवटचे विसर्जन अग्रवाल नगरातील अग्रसेन मित्र मंडळाच्या गणेशमुर्तीचे करण्यात आले. शहरातील मोठ्या गणेश मंडळांच्या वतीने काल सायंकाळी ४ वाजेनंतर विसर्जन मिरवणुकांना सुरवात झाली. सर्व मिरवणुका आग्रारोडवरुन मार्गस्थ होत असल्याने हा रोड अक्षरशः गर्दीने फुलून गेला होता. गुलालाची उधळण करत डीजेचा दणदणाटात गणेशभक्त ठेका धरताना दिसत होते. मिरवणुकीत महिलांसह तरुणींनीही लक्षणीय सहभाग नोंदवला. मिरवणुकीतील बारा पावली, लेझीम नृत्याने सार्यांचे लक्ष वेधून घेतले होते.

संकलन : दिपक वाघ